# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिविषयक विचार

**डॉ. विनोद कांबळे** म. ह.शिंदे महाविद्यालय, तिसंगी ता.गगनबावडा जि. कोल्हापूर मोबा.9850433807

---

*** प्रस्ताविक :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१९ मध्ये साऊथबरो समितीसमोर साक्ष दिली. या साक्षीने आपल्या बांधवाबद्दल असणारी आपल्या मनातील तळमळ त्यांनी जाहीरपणे व्यक्त केली.त्यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात इथूनच झाली. १९१९ते १९५६ हा सबंध काळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळ,आंदोलन,विचार, लेखन, भाषण आणि कार्याने विलक्षण प्रभावित झाला होता. त्यांच्या सामाजिक, राजकीय,शैक्षणिक,सांस्कृतिक विचारांचा जबरदस्त प्रभाव सर्व क्षेत्रावर पडलेला होता.

विचार ही मानवी जीवनातील महत्त्वाची संकल्पना आहे.विचारामुळे मानवी जीवनाला ऊर्जा आणि अस्तित्व प्राप्त होते. बाबासाहेबांनी आपले विचार आणि कृतीद्वारे माणसाचे महत्व माणसांना समजून सांगितले आहे. त्यांनी सामाजिक, धार्मिक, राजकीय,आर्थिक,शैक्षणिक,स्त्रीविषयक, कामगार विषयक, वाड.मयीन,विज्ञाननिष्ठ असे मूलगामी विचार मांडले आहेत.

आपला भारत देश हा शेतीवर जगणारा आहे. सारा जनसमूह शेतीवर अवलंबून आहे.नुसते शेतकऱ्याचेच नव्हे तर देशाच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती हेच आहे. शेती तसेच शेतकरी आणि त्यावर ते अवलंबून असणारे सारे जनसमूह विचारात घेऊन आपल्याला बाबासाहेबांच्या कृषिविषयक विचारांची मांडणी करता येईल.

***विचार : संकल्पना व स्वरूप :**

'विचार' ही संकल्पना सजीवांशी निगडित आहे. इतरांच्या तुलनेने विचार करण्याची क्षमता मानवात अधिक आहे. आपण माणूस आहोत असे सांगण्यासाठी जशी भाषेची आवश्यकता असते तसेच आपण विचार करतो हे सांगण्याची गरज असते. त्यामुळे मानव हा विचारशील प्राणी आहे.आपल्या एकूणच जगण्याबाबत आणि असल्याबाबत तो विचार करत असतो. त्यामुळे 'विचार' या संकल्पनेला मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.'विचार ' या शब्दाचे मराठीत पुढीलप्रमाणे अर्थ आढळतात. विचार म्हणजे "कल्पना व बुद्धी यांचा व्यापार,मनःपूर्वक केलेला अभ्यास,खलबत्त,मसलत,विचारविनिमय, मनोदय, अभिप्राय,मत"(१) विचार म्हणजे,"मनोव्यापार,चर्चा, मनन,तर्क, कल्पना,युक्तायुक्तता, पाहणे,मर्यादा"(2) हिंदीमध्ये विचार म्हणजे, "ख्याल, संकल्प, संचार "(3) तर इंग्रजीमध्ये 'विचार' या शब्दास Thought हा पर्यायी शब्द आहे. Thought म्हणजे "idea, notion, thinking, regard, care, attention "(4) मानवी मनामध्ये अनेक प्रकारचे विचार येत असतात. मानव विचार करून एखादी क्रिया करत असतो. त्यामुळे मानवाच्या एकूणच जडणघडणीमध्ये विचाराला महत्त्वपूर्ण स्थान आहे. विचार ही एक मानसिक, बुद्धिनिष्ठ प्रक्रिया आहे.

आपल्या देशामध्ये साहित्यात 'विचार' प्रक्रियेशी सुसंगत अशी मांडणी करणारी मोठी परंपरा आढळते.' विचार' हा या समाज व्यवस्थेमध्ये प्राचीन काळापासून ते आज जागतिक काळापर्यंत टिकून आहे. अनेक विचारवंत या समाजामध्ये होऊन गेले.समाजरचना एका विशिष्ट विचारधारेवरती टिकून नसल्यामुळे त्यात बदल झाले. काही पोकळी निर्माण झाली. तरीही इथला समाजहिताचा 'विचार' चिरकाल टिकून आहे. भारतीय विचार परंपरेत चैतन्यवादी विचार परंपरा, भौतिकवादी विचार परंपरा, लोकायत दर्शन परंपरा अशा दिसून येतात. १९व्या शतकामध्ये प्रबोधनपर विचार, सत्यशोधकी विचार, राजकीय विचार, शैक्षणिक विचार, निबंधकार विचारवंत आपणास पाहावयास मिळतात. विसाव्या शतकामध्ये स्वातंत्र्यविषयक विचार,सामाजिक विचार, अध्यात्मवादी विचार,परिवर्तनवादी विचार अशी मांडणी झालेली दिसून येते. १९ वे आणि २०वे शतक याची मांडणी करत असताना १९वे शतक हे समाजपरिवर्तनाचे शतक म्हणून संबोधले जाणे शक्य होईल तर २०वे शतक हे राजकीय घडामोडींचे, परिवर्तनाचे शतक म्हणून संबोधता येईल.

***डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा उदय :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आयुष्य संघर्ष आणि अन्यायाने पछाडलेले होते. परंतु याचे त्यांनी कधीच भांडवल केले नाही. वडील मेजर रामजी यांनी पालनपोषण केले. घरची गरीबी असूनही ते शिक्षणाचे भोक्ते होते. भीमरावांनी विद्येची उपासना करून आपले चारित्र्य चांगले करावे यासाठी त्यांनी मनःपूर्वक धडपड केली. काही काळ दापोलीत राहिल्यानंतर साताऱ्याला रामजींनी स्थलांतर केले.१८९६ मध्ये सातारा येथील 'ॲग्रिकल्चर स्कूल'मध्ये त्यांचे नाव दाखल केले. १९०४ मध्ये ते चौथी पास झाले. निवृत्ती वेतनावर खर्च चालवणे अवघड झाल्याने रामजींनी मुंबईला प्रस्थान केले. येथील एल्फिस्टन हायस्कूलमध्ये भीमरावांचे नाव घातले.अनेक अडचणीवर मात करून १९०७ मध्ये ते मॅट्रिक उत्तीर्ण झाले. यावेळी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या शिष्यवृत्तीमुळे त्यांचे पुढचे शिक्षण सुरू झाले.१९१३ मध्ये पार्शियन व इंग्रजी हे विषय घेऊन बाबासाहेब बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले.वयाच्या चौदाव्या वर्षी तत्कालीन प्रचलित पद्धतीनुसार रमाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला.

बडोद्याला नोकरीसाठी गेल्यावर तिथेही बाबासाहेबांना अस्पृश्यतेचा अनुभव आला.

२ फेब्रुवारी १९१३ रोजी रामजींचे निधन झाले. त्यानंतर मात्र त्यांनी सयाजीरावांना भेटून आपल्या शिक्षणाबद्दल माहिती दिली. त्यावेळी त्यांनी परदेशात शिक्षणासाठी परवानगी दिली.१९१३ ते १९१६ या तीन वर्षासाठी त्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली. या शिष्यवृत्तीच्या रूपाने बाबासाहेबांना उच्च शिक्षणाची संधी मिळाली. शिष्यवृत्ती संपल्यानंतर परत भारतात आल्यावर शिष्यवृत्तीच्या

अटीवर त्यांची नेमणूक झाली होती.परंतु अस्पृश्य असल्याचा कलंक काही धुतला जात नव्हता.अपमान,टवाळी, अवहेलनाही त्यांच्या वाट्याला नेहमी येत होती.शेवटी महाराजांच्या कानावर ही गोष्ट घालून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. परंतु काही मार्ग निघत नव्हता.शेवटी त्यांनी बडोदा संस्थान सोडले आणि घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे १९१८मध्ये मुंबईच्या सिडनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी स्वीकारली. १९२०मध्ये बाबासाहेब इंग्लंडला गेले. १९२१ मध्ये ते एम. एस्सी.झाले.'Problem of Rupee' हा प्रबंध लंडन विद्यापीठाने मान्य करून त्यांना डी. एस.सी. ही अर्थशास्त्रातील सर्वोच्च पदवी दिली.१९२३ मध्ये मुंबईत परत आल्यानंतर त्यांनी हायकोर्टात वकिली सुरू केली.'अस्पृश्यता निवारण' हे इथून पुढील काळात बाबासाहेब यांनी आपले जीवित कार्य मांडले. त्यानंतर त्यांनी अस्पृश्यांना शिक्षण देणे,त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे,सामाजिक,आर्थिक,समतेच्या हक्कासाठी अहिंसक मार्गाने संघटितपणे लढा देणे, हे त्यांनी पुढील काळासाठी प्रमुख कार्य केले.त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सार्वजनिक क्षेत्रातला उदय म्हणजे भारतीय समाजव्यवस्थेच्या पुनर्मांडणीचा आरंभ होय. त्यांच्या जीवन चरित्राबद्दल चरित्रकार धनंजय कीर म्हणतात, " बाबासाहेब म्हणजे मानव -स्वातंत्र्याच्या इतिहासाचे ते एक सोनेरी पान आहे.स्वतःच्या बुद्धिमत्तेवर विसंबून राहून जो गाढ तपश्चर्येने, अलौकिक धैर्याने नि अखंड उद्योगशीलेतेने उच्च ध्येयासाठी अविरत झगडतो तो धुळीतून धुरंधरांच्या मालिकेत जाऊन कसा विराजमान होतो हे सिद्ध करणारे उदाहरण आधुनिक भारतात सामान्य मनुष्यास अन्यत्र सापडणे कठीण आहे." (5) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत कोणत्याही वैयक्तिक स्वार्थाची तमा न बळगता अस्पृश्यता, सत्याग्रह, चळवळ, नियतकालिक, शिक्षणसंस्था, धम्म स्वीकार,भारतीय संविधानाचे कार्य केले.या कार्याला त्यांनी तन,मन व धन समर्पित केले. त्यामध्ये काळाराम मंदिर प्रवेश,पर्वती मंदिर प्रवेश, महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह,मनुस्मृती दहन यासारख्या सत्याग्रहांनी त्यांनी पशुतुल्य लेखल्या जाणाऱ्या माणसाला 'माणुसकी'साठीचे हक्क मिळवून दिले. त्यामुळे जगात आजवर जे पददलितांचे कैवारी होऊन गेले,मानवी स्वातंत्र्याचे शिल्पकार होऊन गेले त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान उच्च आहे.

***बाबासाहेबांचे कृषिविषयक विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आयुष्यात ज्या चळवळी, लढे, सत्याग्रह, नियतकालिके, लेखन, भाषणे इत्यादी कार्य केले आहे. त्याआधारे त्यांच्या विविध विचारांचे स्वरूप आपणास शोधता येईल. बाबासाहेबांनी अमेरिका, इंग्लंड इ. देशात शिक्षण घेतल्यामुळे त्या त्या देशातील सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक यासारख्या घटनांचा प्रभाव त्यांच्या विचारावर पडलेला दिसेल. बाबासाहेबांनी उभारलेल्या लढ्यातून झालेल्या परिणाम तसेच त्यांनी लिहिलेल्या विविध विषयातील ग्रंथामधून मांडलेले विचार याद्वारे कृषिविषयक विचार मांडता येईल.

या देशामध्ये शेती,शेतकरी आणि शेतीशी संबंधित समूहाचा मूलभूत विचार छत्रपती शिवाजी महाराज जोतिराव फुले,राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेला आहे. म्हणजेच या देशांमध्ये शेतीवरती अवलंबून असणाऱ्या ७० % पेक्षा अधिक लोकांचा विचार व कार्य या महापुरुषांनी केले आहे. बाबासाहेबांनी आयुष्यभर शेतीच्या तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार केला. त्यासाठी त्यांनी विविध भूमिका घेतल्या. चळवळी, आंदोलने, भाषणे केली त्यांच्या कृषिविषयक विचारांचे केंद्र हे छोटे शेतकरी असल्याचे आपणास दिसून येईल.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीच्या प्रश्नांची चिकित्सा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून केली आहे.त्यांनी फक्त चिकित्साच केली नाही तर ते प्रश्न सोडविण्यासाठी मूलभूत उपाययोजनाही सांगितल्या आहेत. त्यांचे कृषिविषयक विचार हे प्रमुख्याने स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील समस्याशी निगडित आहेत. मात्र आजच्या कृषिविषयक प्रश्नांची समस्या सोडविण्यासाठी त्यांच्या या विचारांचा निश्चित उपयोग होईल. त्यांनी कृषी संबंधीचा विचार राष्ट्रीय पातळीवरून केला आहे. शेतकऱ्याकडून वसूल केल्या जाणाऱ्या शेतसाऱ्यासंबंधी अर्थशास्त्रज्ञ आणि भारतीय सामाजिक चळवळीचे तत्कालीन अग्रणी म्हणून त्यांनी स्पष्ट भूमिका घेतली होती. त्याचाच एक नमुना म्हणून त्यांचा पुढील विचार महत्त्वाचा ठरतो, " While other countries like the U. S. A. starting as agricultural are progressively becoming industries, India has been gradually undergroing the woeful progress of de- urbanization and swelling the volume of her rural Population beyond all needs"(६) या उदाहरणातून ज्यावेळी इतर राष्ट्रीय ज्यामध्ये यू.एस.ए. की, जी शेतीपासून सुरुवात करून उत्तरोत्तर सुधारत औद्योगिक बनत आहेत. अशावेळी भारत मात्र सर्व गरजांच्या पलीकडे जाऊन वाढत्या शहरीकरणाचा, ग्रामीण लोकसंख्येच्या वाढत्या मूल्यांचा विषण्ण अनुभव घेत आलेला आहे. स्वतंत्र भारतामध्ये ग्रामजीवनाचा स्तर उंचावण्याकरता शासन जे प्रयत्न करते त्याचा पाया मुख्यतः सामाजिक न्याय हाच असायला पाहिजे. यासाठी त्यांनी औद्योगिकीकरण व शेती यांचे अतूट नाते असायला पाहिजे असे सुचविले होते.

बाबासाहेबांनी शेतकऱ्यांचे होणारे शोषण रोखण्यासाठी खोती पद्धतीकडे ते आपले लक्ष वेधतात. मुंबई कायदेमंडळात १७ सप्टेंबर १९४७ रोजी त्यांनी खोती पद्धत रद्द करण्याविषयी विधेयक मांडले. ही खोती रत्नागिरी ठाणे व कुलाबा( रायगड) या जिल्ह्याच्या काही भागात प्रचलित होती. या पद्धतीत शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोताची नियुक्ती केलेली असते. या पद्धतीमध्ये जमीन कसणाऱ्याला कनिष्ठ भूधारक आणि खोताला वरिष्ठ भूधारक असे म्हटले जाई. या खोती पद्धतीमधून भूधारकांकडून शेतसारा गोळा करून त्याचा काही हिस्सा शासनाच्या तिजोरीत देण्याची जबाबदारी खोताकडे असायची. मात्र या स्वातंत्र्याचा खोत दुरुपयोग करीत आणि भूधारकांवर अनेक प्रकारचे जुलूम करीत.नंतर याचा परिणाम असा झाला की, भूधारकांमध्ये हा असंतोष खदखदू लागला. ते खोती नष्ट करण्याची मागणी करू लागले. त्यामुळेच २०मे १९३८ रोजी महाड येथे खोती बील व राजकारण यावर

बोलताना बाबासाहेब म्हणाले, "खोती नष्ट करण्याचे मी हाती कंकण बांधले आहे. काँग्रेस सरकार बिलाला पाठिंबा देईल किंवा नाही ते सांगता येणार नाही.परंतु वारा उलट दिशेने वाहत आहे.जर खोती बील नापास झाले तर मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी तुरुंगात जाण्याचा निश्चय केला आहे. तुम्ही आमच्या मागे आले पाहिजे. इतकी तयारी असल्यावर खोती नष्ट करायला करण्याला अवधी लागणार नाही"(७) या पद्धतीमधून त्यांनी शेतकऱ्यांमध्ये आत्मसन्मानाची जाणीव तर निर्माण केलीच त्याशिवाय त्यांच्यावर होणाऱ्या विविधांगी अन्यायाचे स्वरूप स्पष्ट करून त्याविरुद्ध लढण्याची दिशाही दिली.

बाबासाहेबांनी जलव्यवस्थापनाच्या क्षेत्रातही महत्त्वपूर्ण असे विचार मांडले आहेत. १९४२ ते ४६ या काळामध्ये ते 'मजूरमंत्री' म्हणून कार्यरत असताना त्यांनी बांधकाम,पाटबंधारे आणि ऊर्जा अशा अतिरिक्त नव्याने निर्माण केलेल्या खात्यांचा कार्यभार सांभाळताना महत्त्वपूर्ण असे निर्णय घेतले आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली काही प्रकल्पही पूर्ण झाले. बाबासाहेब पाण्याकडे 'संपत्ती' म्हणून पहात. पाण्याशिवाय शेती व्यवसाय अस्तित्वात येऊ शकणार नाही याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळे पाण्याचे जतन करून त्याचा ऊर्जा म्हणून वापर करण्यावर त्यांचा अधिक भर होता. मोठ्या नद्यांवर धरणे, बंधारे, पुराचे पाणी आडवणे, अंतर्गत नदी जोडणी प्रकल्प यामुळे संचित केलेले पाणी खेळत ठेवणे.त्याचा सिंचन आणि उद्योगासाठी वापर करणे जेणेकरून पाण्याच्या अभावामुळे त्रस्त झालेल्या जनतेला,शेती व्यवसायाला दिलासा मिळेल अशी त्यांची भूमिका होती. मंत्रीपदाच्या या काळात१९४४ मध्ये आपल्या सक्षम नेतृत्वामुळे 'दामोदर नदी प्रकल्प' ( पश्चिम बंगाल)हा उभारला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून काम केले आहे. यामध्ये त्यांनी जलधोरणाची तरतूद केली. केंद्रीय जल आयोगाची रचना, प्रकल्प उभारणीसाठीची प्राधिकरणे तसेच भारतीय संविधानातील जलधोरणासंबंधीच्या तरतुदीही आहेत.शेतीसंबंधी चिंतन करणाऱ्यांना तर ते अधिकच समजू शकतील.बाबासाहेबांना मजूर खात्याबरोबरच ऊर्जा खातेही देण्यात आले होते. त्यांनी या विषयाला ऊर्जा दिली. त्यामुळे ते या देशाचे पहिले 'ऊर्जामंत्री'ठरतात. त्यांनी वीज विकास,वीज पुरवठा यासंबंधीचे राष्ट्रीय धोरण प्रथम आखले. त्यांनी आखलेल्या धोरणानुसार आजही आपले विजेबाबतचे धोरण आहे. या माध्यमातून बाबासाहेबांनी शेतीला, कृषी उद्योगाला स्वस्त व मुबलक वीज मिळाली पाहिजे अशी भूमिका घेतली होती. त्यांच्या या विचारांचा जर गंभीरपणे अवलंब झाला असता तर भारतातील आजचे चित्र शेती, पूर,दुष्काळ, उद्योगधंदे इत्यादी बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण दिसले असते.

***समारोप:**

एकंदरीतच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषिविषयक विचारांचा परामर्श घेत असताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते ती ही की,त्यांनी दलित,अस्पृश्य व्यतिरिक्त इतर बहुजन श्रमिक वर्गाच्या व्यवस्थापनाचा अत्यंत मूलगामी विचार मांडला आहे.शेतकऱ्यांना मध्यवर्ती प्रवाहात आणण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम राबविला आहे. तरी इथल्या पारंपरिक व्यवस्थेने बाबासाहेबांच्या असामान्य पैलूकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे आज स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही आराजक सदृश्य स्थिती निर्माण झाली आहे.त्यासाठी त्यांचा विचारच नवसंजीवक व मूलगामी ठरू शकतो. २१व्या शतकामध्ये शेती समस्येवरील हाच सर्वोत्तम विचार ठरावा. ही ऊर्जा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषिविषयक विचारात आहे.

*** संदर्भसूची:**

१. भाटवडेकर मो.वा. : राजहंस व्यवहारिक मराठी शब्दार्थ कोश, राजहंस प्रकाशन, पुणे (२००७) पृ.५८५

२. आपटे,वा.गो. : विस्तारीत शब्दरत्नाकर, वरदा प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे (२०००) पृ.६५३

३.शरण : दिनमान हिंदी शब्दकोश, दिनमान प्रकाशन, दिल्ली(१९८८) पृ.३६३

४.Virkar, K. B.: The Little Modern Dictionary, Anmol prakashan, Pune (2004) page. 1011

५.कीर धनंजय: डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९८९आवृत्ती सहावी,पृ. १०

६.Ambedkar, Babasaheb : Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches, Govt. of Maharashtra (1990), Vol.I Page. 479

७. आंबेडकर, बाबासाहेब : डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग- २, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन मुंबई (२००२) पृ.१६२